लोकमत



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सुरक्षारक्षकांना सॅनिटायझर देऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी शेजारी डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठातर्फे कर्मचाऱ्यांना सॅनिटायझर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे (एनएसएस) विद्यापीठात 'अत्यावश्यक सेवे'वर कार्यरत असणाऱ्या सेवकांसह विद्यापीठ कॅम्पसवरील रहिवाशांना सॅनिटायझर, मास्कच्या एक हजार किटचे वाटप शुक्रवारी करण्यात आले.

विद्यापीठाच्या विविध निवासस्थानांमध्ये शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे कुटुंबीय राहतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या सर्व घटकांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने एनएसएस कक्षाच्या वतीने या सर्व घटकांना सॅनिटायझर, मास्क यांच्या किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाची सुरुवात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सुरक्षारक्षकांना किट देऊन करण्यात आली. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या निवासस्थानी कार्यरत असलेल्या रक्षकांना त्यांच्या हस्ते किट वाटप करण्यात आले. सर्वच कर्मचाऱ्यांनी आरोग्य सुरक्षाविषयक निकषांचे पालन करून कोरोनाला पराभूत करावे, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी समन्वयक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

> 'एनएसएस' कक्षातर्फे हाती घेण्यात आलेला सॅनिटायझर कीट वाटपाचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आणि कौतुकास्पद आहे.
>
> \- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

पुढारी

# मेनन आणि मेनन कोरोनाविरुद्धच्या लढ्यात अग्रणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ऑटोमोटिव्ह आणि ट्रॅक्टर उद्योगातील सिलिंडर ब्लॉक्स आणि सिलिंडर हेडचे प्रख्यात निर्माता मेनन आणि मेनन लिमिटेड, कोल्हापूर यांनी कोविड-१९ विरुद्ध सर्व देशभर लढा देण्यासाठी गरज असलेली उत्पादने आणि सेवांची निर्मिती प्रक्रिया चालू केली आहे. कंपनीने कोरोना विरुद्ध लढ्यातील गरज ओळखून नवीन उपाय शोधण्याच्या उद्देशाने काही कार्यदले तयार केली आहेत.

या कार्यदलांच्या प्रयत्नाने व स्थानिक प्रशासन, सीपीआर, सचिन हॉस्पिटल, आयआयटी-बॉम्बे, केएलई, शिवाजी विद्यापीठ आणि केआयटीसारख्या नामवंत शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांच्या सहकार्याने अनेक उत्पादने विकसित होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कमी किमतीचे मेकॅनिकल व्हेंटिलेटर, निर्जंतुकीकरण टनेल,



व्हेंटिलेटर

मास्क, पी.पी.ई. किट, सॅनिटायझर आणि जंतुनाशक, सेमी फॉवलर बेड्स आणि हॉस्पिटल ट्रॉली इत्यादींचा समावेश आहे.

मेकॅनिकल व्हेंटिलेटरचा नमुना तयार करून त्याच्या प्रारंभिक चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. याचा प्रोटोटाईप आणखी तज्ज्ञांकडून प्रमाणित केला जाईल. निर्जंतुकीकरण चेंबरच्या नमुन्यालाही मान्यता मिळाली असून कंपनीच्या कार्यदलाने महानगरपालिकेला यापूर्वीच एक नमुना दिला आहे. तो पालिका आयुक्तांच्या ताराबाई गार्डन कार्यालयात कार्यरत आहे. किराणा आणि औषधांसह अत्यावश्यक सेवा पुरवण्यासाठी कंपनीच्या कार्यदलाने हेल्पलाईन सुरू केली आहे. देश कठीण प्रसंगातून जात असताना अशा उपक्रमांमुळे लोकांची खरी क्षमता समोर येते. एक व्यावसायिक संघटना म्हणून आम्हाला सार्वजनिक-खासगी भागीदारीचे मूल्य आणि विविध पार्श्वभूमीतील लोक एकत्रित येऊन नावीन्यपूर्ण अभिनव निर्मिती केल्याबद्दल अभिमान आहे, असे मेनन आणि मेनन लि. चे प्रवीण ताले यांनी सांगितले.

Kolhapur Edition
18 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# कोल्हापुरात कोव्हिड-१९ केअर, हेल्थ रुग्णालय सुरु

## दानशूरांनी मदत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

## शिवाजी विद्यापीठ, घोडावत विद्यापीठ येथे प्रत्येकी ५०० खाटांचे रुग्णालय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि संजय घोडावत विद्यापीठ या ठिकाणी प्रत्येकी ५०० खाटांचे कोव्हिड केअर आणि कोव्हिड हेल्थ रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रुग्णालयासाठी उपकरणांसह विविध मदतीची गरज आहे. दानशुरांनी पुढे येऊन kolhapuriwarriors.com या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी गुरुवारी केले.

कोव्हिड-१९ मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. येथील शिवाजी विद्यापीठ आणि संजय घोडावत विद्यापीठ या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ५०० खाटांचे कोव्हिड केअर आणि कोव्हिड हेल्थ रुग्णालय सुरू करण्यात येत आहे. या रुग्णालयासाठी वैद्यकीय व्यावसायिक, पॅरामेडिकल, वॉर्डबॉय, परिचारिका, फार्मासिस्ट, आरोग्यसेवक, वैद्यकीय उपकरणे, दवाखान्यात लागणारे इतर साहित्य, विविध प्रकारच्या सेवा, संगणक, तांत्रिक सेवा, अशा विविध प्रकारच्या सेवा आणि वस्तूंची रुग्णालयासाठी आवश्यकता आहे. जिल्ह्यातील दानशूर व्यक्ती तसेच सामाजिक संस्थांनी पुढे येऊन मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.



# शिक्षणाचे गणित बिघडले

## परीक्षा अर्धवट राहिल्याने निकाल रखडले; प्रवेशांवर प्रश्नचिन्ह

कोल्हापूर टाइम्स टीम

अभ्यासात तल्लीन झालेले विद्यार्थी, शैक्षणिक प्रोजेक्ट सबमिशन्ससाठी सुरू असलेली लगबग, जर्नल्स पूर्ण करण्याची घडपड, शाळा , कॉलेजमध्ये परीक्षांच्या नियोजनाचे वेळापत्रक आखण्यापासून ते प्रत्यक्ष परीक्षा निकालपत्र तयार करण्यात व्यस्त शिक्षक. शैक्षणिक वर्षातील मार्च आणि एप्रिल महिन्यातील हे चित्र. यंदा मात्र मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून आजपर्यंत शाळा, कॉलेजचे गेटच बंद आहे आणि विद्यार्थी घरात आहेत. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेल्या एक महिन्यापासून बंद असलेल्या शाळा, कॉलेज, विद्यापीठाच्या कामकाजामुळे शैक्षणिक वेळापत्रकाचे चक्रच थांबले आहे.

कोल्हापुरात करोना संसर्गाने १४ मार्चला धोक्याची घंटा दिली. तेव्हा प्रशासनाने पहिले दक्षतेचे पाऊल उचलले ते लोक एकत्र जमण्याच्या ठिकाणांकडे. पहिल्या टप्प्यात प्राथमिक, माध्यमिक शाळा बंद केल्या तर दुसऱ्या टप्प्यात कॉलेज व विद्यापीठातील अधिविभाग बंद केले. त्यानंतर करोनाचा धोका वाढतच राहिल्याने शिक्षक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनाही घरीच थांबण्याचे आदेश प्रशासनाने दिले. शाळा, कॉलेज, विद्यापीठ बंद होऊन उलटलेल्या एक महिन्याच्या काळात शैक्षणिक परिणामाअंतर्गत कोलमडलेले वेळापत्रक आणि पुढील शैक्षणिक प्रक्रियेवर आलेले विलंबाचे सावट आता स्पष्ट दिसत आहे.

दरम्यान जून पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर नियोजित परीक्षा, प्रवेश परीक्षा, निकाल आणि प्रवेश प्रक्रिया या सगळ्याचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडून गेले आहे. अजूनही करो ना साथीचा धोका कायम असल्यामुळे येणारे शैक्षणिक वर्ष विस्कळीत होण्याची चिन्ह निर्माण झाली आहेत.

### लॉकडाउनमुळे ब्रेक

२२ मार्च रोजी केंद्र सरकारने जनता संचारबंदी लागू केली. तर २५ मार्च पासून २१ दिवसांचा लॉकडाउन आता ३ मेपर्यंत वाढवला आहे. ४१ दिवस शैक्षणिक क्षेत्रात कोणताच निर्णय न झाल्याचे चित्र आहे.



### विद्यापीठ परीक्षा अधांतरीच

लॉकडाउनमुळे विद्यापीठ प्रशासनाला पुढचे वेळापत्रक करण्यासाठीही मर्यादा येत आहेत. सध्या यासाठी राज्यस्तरावर पाच सदस्यांची समिती नेमण्यात आली आहे. ऑनलाइन परीक्षा घेण्याच्यादृष्टीने विचार सुरू आहे. मात्र मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत तरी याबाबत निर्णय होण्याची शक्यता दिसत नसल्याने यंदा उच्चशिक्षणाचे चक्रही बिघडले आहे.

### दहावी, बारावीचा निकालही रखडणार

दहावी व बारावीची परीक्षा सुरळीत झाली असली तरी उत्तरपत्रिका तपासून त्या गुणपरीक्षण व निकालपत्र तयार करण्यासाठी अजून बोर्डाकडे जमा झालेल्या नाहीत. तीन मेनंतरच या प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा निकाल लांबणीवर पडणार आहे. अकरावी व पदवीच्या प्रथम वर्षांच्या प्रवेशप्रक्रियेला यंदा ऑगस्ट अखेर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे यंदा शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील परीक्षा आणि निकालाचा गोंधळ होण्याची शक्यता आहे. पुढील वर्षाची प्रवेश प्रक्रिया देखील सुरु करता येणार नाही, असे सध्याचे वातावरण आहे.

### प्रवेश परीक्षांचे दार बंदच

विविध अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा मार्च ते एप्रिल मध्ये होत असतात. पण यंदा एकही प्रवेश परीक्षा झालेली नाही. सीईटी सेल एमएचटी-सीईटी या परीक्षाही नियोजित होत्या. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक यापूर्वी जाहीर झाले होते. करोनामुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीत संचारबंदी कायद्याने शैक्षणिक वेळापत्रकावर चांगलाच परिणाम झाला आहे. अभियांत्रिकी, विधी ,कृषी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते. मात्र करोनामुळे या परीक्षा लांबणीवर जाणार असल्याने तसेच निकाल व नव्या अभ्यासक्रमाची सुरुवात यावरही परिणाम होणार आहे.

> सर्वच परीक्षा सध्यातरी लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. करोनाचे संकट गंभीर असल्याने शाळा कॉलेज विद्यापीठ बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या पातळीवर महत्त्वाचा निर्णय होता. शैक्षणिक नियोजनावरू याचा परिणाम झाला आहे.
>
> सत्यवान सोनावणे,
> शिक्षण उपसंचालक

# राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे १००० कीटचे वाटप

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे विद्यापीठात अत्यावश्यक सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या सेवकांबरोबरच कॅम्पसमधील रहिवाशांना सॅनिटायझर आणि मास्कचे वाटप केले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सुमारे १००० कीटचेही वाटप केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये सुरक्षा, उद्यान, आरोग्य तसेच पाणीपुरवठा आदी अत्यावश्यक सेवांवर कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाच्या गरजेनुसार आस्थापनासह अन्य काही विभागातील कर्मचारीही कामकाजावर उपस्थित आहेत. विद्यापीठाच्या विविध निवासस्थानांमध्ये अनेक शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि त्यांचे कुटुंबिय राहतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने सॅनिटायझर व मास्कचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमाची सुरुवात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निवासस्थानापासून झाली. तेथे कार्यरत सुरक्षा रक्षकांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते कीट वाटप केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याही निवासस्थानी कार्यरत असलेल्या रक्षकांना कीटचे वाटप झाले. शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड आणि समन्वयक डॉ. अभय जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएसच्या स्वयंसेवकांनी सुरक्षा रक्षक, कर्मचारी आणि निवासी यांना कीटचे वाटप केले.

तरुण भारत Sat, 18 April 2020
https://epaper.tarunbharat.com/c.

# कुलगुरू निवड प्रक्रिया रेंगाळली

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाल १४ जून रोजी संपत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या सहा महिन्यांपासून कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू होती, मात्र सध्या लॉकडाउनमुळे ही प्रक्रिया रेंगाळली आहे. १४ जूनपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास अन्य विद्यापीठांच्या कुलगुरुंकडे कार्यभार सोपवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी जून २०१५ रोजी सूत्रे हातात घेतली. त्यांची मुदत १४ जूनपर्यंत आहे. कुलगुरूपदाच्या निवडीची प्रक्रियासाठी गेल्या सहा महिन्यांपासून नियमाप्रमाणे प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यामध्ये कुलगुरू निवड समिती सदस्य निवड करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्यावतीने बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीमध्ये समिती सदस्यपदासाठी नाव देण्यात आले होते. त्यानंतरची प्रक्रिया झाली नसल्याने निवडीबाबत कोणताही कार्यक्रम जाहीर केलेला नाही. कुलगुरूपदासाठी अध्यापन क्षेत्रातील विभागप्रमुख म्हणून पाच वर्षांचा अनुभव तसेच संशोधन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम, पेटंट व संशोधन प्रकल्प यातील सहभाग, समितीच्या कामकाजाची माहिती तसेच प्रशासकीय कामकाजातील अनुभव यासह पीएचडी विद्यार्थ्यांना गाईड म्हणून काम करण्याचा अनुभव पात्रता आवश्यक आहे. या पात्रता निकषांमध्ये पात्र व्यक्तींकडून कुलगुरू पदासाठी अर्ज करू शकतात. सध्या उच्च शिक्षण क्षेत्रातील संशोधक, प्राध्यापक इच्छुक आहेत.

### मुदतवाढ नाहीच

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून करोना संसर्गाच्या फैलावामुळे राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्व कामकाज बंद आहे. परिणामी कुलगुरूपदाची निवड प्रक्रियादेखील सध्या रेंगाळली आहे. नियमानुसार कुलगुरूंना मुदतवाढ मिळत नाही. मात्र अशा परिस्थितीत विद्यापीठाच्या अन्य कुलगुरुंकडे प्रभारी कार्यभार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठाच्या बाबतीत देखील प्रभारी कार्यभार देण्याचा पर्याय निवडला जाणार आहे.

## अशी आहे कुलगुरू निवड प्रक्रिया

विद्यापीठाच्या कुलगुरुंची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर ही निवड प्रक्रिया सुरू होते. यामध्ये राष्ट्रपतींसह तीन सदस्य नियुक्त केले जातात. त्यांच्याकडून निवड संदर्भातला प्रस्ताव दिला जातो. त्यानंतर या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाते, त्यानंतर येणाऱ्या प्रस्तावामधून अंतिम पाच जणांची निवड केली जाते. आणि त्यातून एका व्यक्तीची कुलगुरू पदासाठी निवड केली जाते. सध्या त्रिसदस्यीय समितीची स्थापना झाली असून अद्याप या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध न झाल्याने अर्जच आलेले नाहीत. अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुंची मुदत लॉकडाउन काळात संपल्याने त्या विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार अन्य विद्यापीठाच्या कुलगुरुंकडे देण्यात आला आहे.

# शिवाजी विद्यापीठात १००० किटचे वाटप

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे शुक्रवारी विद्यापीठात अत्यावश्यक सेवेवर कार्यरत असणाऱ्या सेवकांबरोबरच विद्यापीठ कॅम्पसवरील रहिवाशांना सॅनिटायझर आणि मास्कच्या सुमारे १००० कीटचे वाटप करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठामध्ये सुरक्षा, उद्यान, आरोग्य तसेच पाणीपुरवठा आदी अत्यावश्यक सेवांवर कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाच्या निकडीनुसार आस्थापनासह अन्य काही विभागांतील कर्मचारीही कामकाजावर उपस्थित राहत असतात. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या विविध निवासस्थानांमध्ये अनेक शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि त्यांचे कुटुंबिय राहतात. कोरोना विषाणू साथीच्या पार्श्वभूमीवर या सर्व घटकांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कक्षाच्या वतीने या सर्व घटकांना सॅनिटायझर व मास्क यांच्या कीटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाची सुरवात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निवासस्थानापासून करण्यात आली. येथील कार्यरत सुरक्षा रक्षकांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते कीट देऊन मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याही निवासस्थानी कार्यरत असलेल्या रक्षकांना त्यांच्या हस्ते कीट वाटप करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठाचे काम 'वर्क फ्रॉम होम'

कोल्हापूर : कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन वाढविण्यात आले आहे. त्यानुसार शासनाच्यावतीने पुढील आदेश येईपर्यंत विद्यापीठाचे काम 'वर्क फ्रॉम होम 'पद्धतीनेच सुरु राहणार आहे तरी अकॅडमिक कामासाठी रोटेशन पद्धतीने आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांना कामावर बोलाविण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.